नगर परिषद नांदेड.

बांधकामाचा परवाना

नांदेड

№ 001888

परवाना क्रमांक : 225

फाईल क्रमांक : 213/17/91-92

दिनांक : 6-12-91

परवाना धारण करणाऱ्याचे नांव सौ. शकुंतलाबाई रावसाहेब कवळे

सी. टी. सर्व्हे नंबर (29/A (10248)) मोहल्ला बंसल नगर नांदेड

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ च्या कलम १८९ व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये व तत्संबंधीत नियमास अनुसरून खालील प्रमाणे बांधकामाची / दुरुस्तीची परवानगी देण्यात येत आहे. सदरील परवान्याचा अंमल आज तारखेपासून एक वर्षा पर्यन्त राहील. तसेच कलम १९३ (१) प्रमाणें बांधकाम पूर्ण झाल्या बाबत लेखी माहीती तपासणीसाठी या कार्यालयात पाठविण्यांत यावी. नगर रचनाकार नांदेड यांनी लाल रंगानें दुरुस्त / मान्य केलेल्या नकाशाप्रमाणें बांधकामाची परवानगी खालील अटीवर देण्यात येत आहे.

१) बांधकाम सुरुकरणे पूर्वी संबंधीत खात्याकडून बीन शेतीचा दाखला घेण्यात यावा. — ✓

२) शेजाऱ्याच्या कोणत्याही प्रकारच्या हक्कास बाधा निर्माण होईल असे बांधकाम करण्यात येवू नये. — ✓

३) मंजूर बाधकाम नकाशाच्या विरुद्ध जर बांधकाम करण्यात आले तर आपणा विरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३ अन्वये कडक कार्यवाही करण्यात येईल. — ✓

४) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ च्या कलम १९३ (१) अन्वये बांधकाम पूर्ण झाल्यानंतर बांधकाम पूर्ण-त्वाचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. व त्यानंतरच इमारतीचा वापर सुरू करावा अन्यथा आपल्या विरूद्ध कडक कार्यवाही करण्यात येईल. — ✓

५) बांधकाम सुरू करणे पूर्वी सिटीसर्व्हे कार्यालयांतून भूखंडाचे नामांतर/हद्दी व क्षेत्रफळाची दुरुस्ती करुन घ्यावी. — ✓

६) बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र घेण्यापूर्वी सिटीसर्व्हे नंबर _____ चे पोट विभागणीची परवानगी घेण्यात यावी. — ✓

७) बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र घेण्यापूर्वी विकास खर्चाची (बेटरमेन्ट चार्जेस) राहिलेली थकबाकी रक्कम पूर्णपणे भरण्यात यावी. — +

८) या कार्यालयाचे संबंधीत अधिकारी जागेवर प्रत्यक्ष पाहणी साठी येतील त्यावेळी त्याचे अवलोकनार्थ मंजूरीचे संबंधीत कागदपत्र दाखविन्यात यावेत. — ✓

९) जोत्या पर्यंत (प्लीथ लेव्हल) चे बांधकाम झाल्यानंतर सदरहू कार्यालयास त्याप्रमाणे अधिकृत आर्किटेक्टच्या प्रमाण पत्रासह कळवावे व पुढील बांधकामास नाहरकतीचे प्रमाणपत्र हया कार्यालयाकडून घेण्यात यावे. — ✓

१०) संबंधीत भूखंडामध्ये अर्जदार यांनी किमान चार झाडे लावली पाहिजेत आणि ती वाढविली पाहिजेत. — ✓

११) मालकी हक्का बाबत कोणी वाद निघाल्यास त्याची — ✓

१२) पूर्ण जबाबदारी आपलेवर राहिल. —

मुख्याधिकारी
नगर परिषद, नांदेड.

याची एक प्रत नगर रचनाकार नांदेड नगरपालिका यांचेमार्फत संबंधीत निरीक्षक यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.

Scanned by CamScanner